आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२६एप्रिल २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून प्रतिपादन

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातला  प्रचार शिगेला

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मुक्त व्यापार करारावर उद्या नवी दिल्ली इथं स्वाक्षऱ्या होणार असल्याची मंत्री पियूष गोयल यांची माहिती

- ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं दीर्घ आजारानं निधन

**आणि**

- देशाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट; महाराष्ट्रात वर्धा, अमरावती आणि अकोला जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

भारतानं विज्ञानाला कायमच देशाच्या प्रगतीशी जोडलं असून याच विचारानं आपले शास्त्रज्ञ नागरी अणू कार्यक्रम पुढे नेत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला.  हा या कार्यक्रमाचा १३३वा भाग होता. काही दिवसांपूर्वीच तामिळनाडूच्या कल्पक्कम इथल्या फास्ट ब्रीडर रिॲक्टरनं क्रिटिकॅलिटीचा टप्पा गाठल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. हे अणू संयंत्र पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानानं तयार करण्यात आलं असून, या ऐतिहासिक यशामुळे यामुळे विकसित भारताच्या संकल्पाला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी योगदान दिलेल्या सर्वांचं त्यांनी अभिनंदन केलं.

आता भारताची पवन ऊर्जा निर्मिती क्षमताही ५६ गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे, आज भारत पवन ऊर्जा क्षमतेमध्ये जगात चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, हे यश आपल्या अभियंत्यांचं, युवा वर्गाच्या परिश्रमाचं तसंच देशाच्या सामूहिक इच्छाशक्तीचं प्रतीक आहे असं ते म्हणाले. या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

येत्या काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार असल्याचं स्मरण करून देत त्यांनी बुद्ध विचारांचं महत्व अधोरेखित केलं. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच होते आणि स्वतःवर विजय मिळवणं हाच सर्वात मोठा विजय असतो, ही त्यांची शिकवण होती. तणाव आणि संघर्षाच्या स्थितीत असलेल्या आजच्या जगात भगवान गौतम बुद्धांचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत असं ते म्हणाले.

देशाच्या विविध भागांत निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. निसर्ग आणि मानव वेगवेगळे नसून आपण एकमेकांचे सोबती आहोत असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - MKB NISARGA ANII MANAV**

भारतीय राष्ट्रीय अभिलेखागारानं एका पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या ऐतिहासिक दस्तऐवजांविषयी त्यांनी माहिती दिली.

फ्रान्समध्ये झालेल्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाचं कौतुक त्यांनी केलं. या पथकातील मुंबईच्या श्रेया मुंदडा हिचा उल्लेखही त्यांनी केला. देशात मुलींमध्ये ऑलिम्पियाडची संस्कृती वेगानं लोकप्रिय होऊ लागली असून, यासाठी मुलींना पाठबळ देणाऱ्या पालकांचंही त्यांनी कौतुक केलं. देशात जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीनं राबवली जात असून, या प्रक्रियेअंतर्गत जनगणनेचे कर्मचारी आपल्याकडे येण्याआधी १५ दिवस नागरिक स्वतः स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण करू शकतात, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराला वेग आला आहे. भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नॉर्थ २४ परगणा जिल्ह्यात प्रचारसभा घेतली. शेतकऱ्यांचं हित हा भाजपासाठी अतिशय महत्त्वाचा मुद्दा असून भाजपाप्रणित केंद्र सरकारनं यासाठी अनेक पावलं उचलली आहेत, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. निवडून आल्यास महिला, बेरोजगार युवांना दर महिन्याला ३ हजार रुपये, तर गर्भवती महिलांना २१ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा भाजपा नेते अमित शहा यांनी तेहट्टा इथल्या प्रचारसभेत केली.  तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या आज भवानीपूर या त्यांच्या मतदारसंघात विविध कार्यक्रम घेत आहेत. पश्चिम बंगाल विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान २९ एप्रिल रोजी होणार आहे. मतमोजणी केरळ, तमिळनाडू, आसाम, पुदुचेरी यांच्यासह ४ मे रोजी होणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधील बॉम्बस्फोटप्रकरणी एन आय ए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं या घटनेशी संबंधित मुख्य आरोपीला आज अटक केली. या स्फोटात गेल्या महिन्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता तर तीनजण  गंभीर जखमी झाले होते. अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहिदुल इस्लाम मोल्ला असं आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मुक्त व्यापार करारावर उद्या नवी दिल्ली इथं स्वाक्षऱ्या होणार असल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी दिली. या दोन देशांचे आर्थिक संबंध आणखी बळकट करण्याच्या दृष्टीनं हा करार म्हणजे एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी सांगितलं. न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅक्ले यांच्यासोबत ताज महाल भेटीदरम्यान गोयल वार्ताहरांशी बोलत होते. येत्या ५ वर्षांत दोन देशांमधला व्यापार दुप्पट करून ५ अब्ज डॉलर्सपर्यंत न्यायचं उद्दिष्ट असल्याचं गोयल म्हणाले. या करारामुळे भारतीय

उत्पादनांना चालना मिळेल आणि व्यापाराच्या संधी वाढतील, असा विश्वास त्यांनी नमूद केला.

**<><><><><>**

ख्यातनाम छायाचित्रकार रघु राय यांचं आज पहाटे नवी दिल्ली इथं दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. रघु राय यांच्या पार्थिवावर नवी दिल्लीत लोधी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले.

रघु राय यांच्या जीवनाविषयी अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**------व्हीसी-----**

*(१८ डिसेंबर १९४२ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतात 'झांग' इथं जन्मलेले रघु राय हे एक स्थापत्य अभियंता होते. वयाच्या २३व्या वर्षीच त्यांनी छायाचित्रण करायला सुरुवात केली, आणि १९६६ मध्ये 'द स्टेट्समन' या वृत्तपत्रात प्रमुख छायाचित्रकार म्हणून ते रुजू झाले. त्यानंतर त्यांच्या कारकिर्दीची पुढली सहा दशकं भारताच्या सामाजिक-राजकीय पटलावरच्या अनेक घडामोडींची साक्ष ठरली.*

*१९७२ मधली बांगलादेश निर्वासितांची समस्या, १९८४ची भोपाळ वायू दुर्घटना यासारख्या देशाच्या आधुनिक इतिहासातल्या काही अत्यंत संवेदनशील घटना, त्यांनी आपल्या कॅमेरात टिपल्या. ख्यातनाम व्यक्तींच्या छायाचित्रांमधून त्यांनी देशाच्या सामाजिक, राजकीय आणि अध्यात्मिक छटा टिपल्या, आणि या व्यक्तींच्या जीवनाकडे पाहण्याचा आतापर्यंत अज्ञात असलेला नवा दृष्टिकोन सादर केला.*

*प्रामुख्यानं कृष्ण-धवल माध्यमातल्या आपल्या छायाचित्रांमधून त्यांनी अत्यंत सामान्य गोष्टींनाही असाधारण रूप दिलं. आपल्या प्रदीर्घ, गौरवशाली कारकिर्दीत राय यांनी भारतातल्या काही आघाडीच्या नियतकालिकांसोबत काम केलं. गेल्या काही वर्षांत, त्यांचे छायाचित्र-निबंध 'टाइम', 'लाईफ', 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द इंडिपेंडंट' आणि 'द न्यू यॉर्कर' यांसारख्या जगप्रसिद्ध प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झाले. 'रघु रायज इंडिया: रिफ्लेक्शन्स इन कलर अँड रिफ्लेक्शन्स इन ब्लॅक अँड व्हाईट' तसंच 'एक्स्पोजर: पोर्ट्रेट ऑफ अ कॉर्पोरेट क्राईम' यांसारखी काही पुस्तकंही त्यांनी लिहिली.*

*राय यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. बांगलादेश युद्ध आणि त्यानंतरच्या घडामोडींच्या वार्तांकनासाठी भारत सरकारनं १९७२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं. )*

<><><><><>

देशाच्या अनेक भागांमध्ये सध्या उष्णतेची तीव्र लाट असून, जगात सर्वाधिक तापमानाची नोंद करणाऱ्या १०० शहरांमध्ये भारतातल्या ९५ शहरांचा समावेश आहे. जगभरातल्या  तापमान वाढीचा कल लक्षात घेता, भारताच्या शहरी आणि ग्रामीण भागात विक्रमी तापमानवाढ दिसून येत आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये तापमानानं  ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असून, काही ठिकाणी ते ४५ अंश सेल्सिअसच्याही जवळ पोहोचलं आहे.  दिल्ली, उत्तर प्रदेशात लखनौ, महाराष्ट्रात नागपूर आणि अकोला, ओडिशामध्ये भुवनेश्वर, आणि  मध्य प्रदेशातील भोपाळ या शहरांमधलं तापमान सामान्य पातळीच्या खूप वर पोहोचलं आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. नागरिकांनी उष्णतेशी संबंधित आजार टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे. देशाच्या वायव्य आणि मध्य भागांत पुढले तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहील आणि त्यानंतर त्याचा  जोर ओसरेल, असा अंदाज आहे. तर हवामान विभागानं  उद्या अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं चेन्नई सूपर किंग्जवर ८ गडी राखून विजय मिळवला. साई सुदर्शन याच्या ८७ धावांच्या खेळीच्या जोरावर चेन्नईनं विजयासाठी दिलेलं १५९ धावांचं आव्हान गुजरातनं १७ व्या षटकात दोन गड्याच्या मोबदल्यात पूर्ण केलं. या सामन्यात गुजरातनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करायचा निर्णय घेतला. कर्णधार ऋतुराज गायकवाड वगळता चेन्नईचा इतर कोणताही  फलंदाज चांगली कामगिरी करू शकला नाही.

//<><><><><>//